**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ३० ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **२०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या एप्रिल ते जून या तिमाहीत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन ७ पूर्णांक ८ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज.**
2. **जपानचा दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी चीन मध्ये दाखल. भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेदरम्यान सुरू उपक्रमांमुळे दोन्ही देशातल्या भागीदारीला चालना मिळेल, असा व्यक्त केला विश्वास.**
3. **केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या हस्ते नागपूरातील कामठीच्या वेकोली अंतर्गत येणाऱ्या डुमरी साईडिंग इथं इलेक्ट्रिक व्हेईकलचे उद्घाटन.**
4. **भारतातील महत्वपूर्ण खनिजांवरील संशोधनाचे मध्यवर्ती केंद्र म्हणून नागपूर विद्यापीठाला मान्यता.**

**---------------------------------------**

सकल देशांतर्गत उत्पादन-जीडीपी

२०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या एप्रिल ते जून या तिमाहीत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन ७ पूर्णांक ८ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे. हा पाच तिमाहींमधील उच्चांक असेल. गेल्या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत, सकल देशांतर्गत उत्पादन ७ पूर्णांक ४ टक्क्यांनी वाढले होते, तर मागील आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ते ६ पूर्णांक ५ टक्के होते. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयान आज जाहीर केलेल्या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीसाठीच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या तिमाही अंदाजानुसार, याच कालावधीत नाममात्र जीडीपी मध्ये ८ पूर्णांक ८ टक्के वाढ झाली आहे. कृषी आणि संलग्न क्षेत्रांमध्ये वास्तविक सकल मूल्यवर्धित वाढ दर ३ पूर्णांक ७ टक्के आहे, जो गेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत १ पूर्णांक ५ टक्के होता.या संदर्भात सचिव अनुराधा ठाकूर यांनी यामागची कारणं विशद केली आहे.........

***(होल्ड बाईट - सचिव अनुराधा ठाकूर ४५ सेकंद)***

***So the Q1 numbers that we have just witnessed, in our view, it reflects the basic resilience of our economy, strengthening of***

***the momentum in the economy and it is anchored in our strong macroeconomic fundamentals. On the supply side, we have seen an all round growth on the manufacturing, construction and service side activity as well as the fact that the agriculture side has shown a robust growth. The Rabi harvest as well as the Kharip sowing have been much in excess of the last quarters and we have a good buffer stock. We have had a good rainfall so that is also showing up the growth as well as the outlook. On the demand side the primary drivers have been domestic and in our economy. In any case, net exports don't contribute so much on the demand side.***

---

पंतप्रधान नरेंद्र मोदी- चीन दौरा

जपानचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी चीन मध्ये दाखल झाले. इथे त्यांचे अत्यंत उत्साहानं आणि पारंपरीक पद्धतीन स्वागत करण्यात आल. तत्पूर्वी १५ व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेदरम्यान सुरू केलेल्या भागीदारी उपक्रमामुळे दोन्ही देशातल्या व्यापार, तंत्रज्ञान, पर्यटन, कौशल्य, सुरक्षा आणि सांस्कृतिक भागीदारीला चालना मिळेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते टोकयोमधे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. मोदी यांनी जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्यासह आज बुलेट ट्रेननं प्रवास केला. सेंदई इथल्या इलेक्ट्रॉन कारखान्याला त्यांनी भेट दिली. यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीसाठी चीनला रवाना झाले. चीनमधे तीएनजिन इथं होणाऱ्या बैठकीत ते सहभागी होतील. शांघाय सहकार्य संघटनेची २५वी शिखर परिषद उद्यापासून चीनमधे तिएनजीन इथं सुरू होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत संघटनेच्या मागच्या २५ वर्षांच्या कामकाजाचा आढावा घेतला जाईल तसंच पुढल्या दहा वर्षांसाठी धोरण आखलं जाईल.

---

पणन महासंघ

केंद्र शासनान निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार राज्यात पणन महासंघामार्फत कडधान्यं तसंच तेलबियांची खरेदी करण्यात येणार आहे. आधारभूत दरान खरेदी करण्याकरीता ई-पिक पाहणी असलेला ७/१२ उतारा

आवश्यक आहे. ही खरेदी प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे राबवली जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी त्यांची ई-पिक पाहणी शासनान दिलेल्या कालावधीत पूर्ण करावी, असं आवाहन पणन महासंघातर्फे करण्यात आलं आहे.

--------------------------------------

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

राज्य शासनाच्या आदेशाला न जुमानता परवान्याशिवाय अनाधिकृत बाईक टॅक्सी सेवा सुरू असलेल्या रॅपिडो, ओला, उबर या सारख्या कंपन्यांवर मोटार परिवहन विभागामार्फत सातत्यानं कारवाई सुरू राहील, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे. राज्य शासनानं ई-बाईक टॅक्सी धोरण निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली असून त्यानुसार संबंधित संस्थांनी परवाने काढून आपली ई -बाईक टॅक्सी सेवा सुरू करावी असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

--------------------------------------

लोक अदालत

राष्ट्रीय विधी सेवा समिती सर्वोच्च न्यायालय आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार, प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश दिनेश सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या 13 सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीच आयोजन करण्यात आल आहे. नागपूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये लोक अदालत होणार आहे. पक्षकारांनी आपली प्रलंबित आणि दाखल पूर्व प्रकरण जास्तीत जास्त आपसी तडजोडीसाठी ठेवावी अस आवाहन पत्रकामार्फत करण्यात आले आहे.

--------------------------------------

आनंदराज आंबेडकर

रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष  आनंदराज आंबेडकर हे विदर्भ दौऱ्यावर येत असून नागपूरला ६ सप्टेंबर  रोजी दिक्षा भूमी नागपूर येथे तथागत बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल फुंकणार आहेत. या नियोजित दौऱ्यात रवि भवन सिव्हिल लाइन्स इथं  पक्ष प्रवेश समारंभाला उपस्थित राहुन रिपब्लिकन सेना विशेषांकाचे  अनावरण करतील.

--------------------------------------

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी-इलेक्ट्रिक व्हेईकल उद्घाटन

केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या हस्ते नागपूर येथील कामठीच्या वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड-वेकोली अंतर्गत येणाऱ्या डुमरी साईडिंग येथे इलेक्ट्रिक व्हेईकल चे उद्घाटन आज पार पडले. येथे असणाऱ्या इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिंग स्टेशन जवळ वेकोलीच्या कामासाठी इलेक्ट्रिक ट्रक गडकरींच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ करण्यात आले. पारंपारिक इंधनाच्या वापरा ऐवजी इलेक्ट्रिक सौर उर्जा, हरित हायड्रोजन यासारख्या अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर केल्यास आपण इंधनावर आयात करत असलेल्या मोठ्या रकमेवर आपल्याला बचत करता येईल. सध्या इलेक्ट्रिक वाहनांमध्ये असणाऱ्या लिथियम आयन बॅटरी ची सुद्धा किंमत कमी झाली असल्याचं गडकरी यांनी यावेळी सांगितलं. यावेळी बोलताना वेकोलीच्या मानव संसाधन विकास विभागाचे संचालक डॉ.हेमंत पांडे यांनी सांगितलं की पहिल्यांदा ही इलेक्ट्रिक व्हेईकल वेकोलिला मिळत असून या द्वारे निश्चितच प्रदूषणाच्या पातळीमध्ये कमी येईल....

***(होल्ड बाईट - संचालक डॉ. हेमंत पांडे)***

***हमारा पहला कदम है जिससे हम ग्रीन एनर्जी की तरफ हमारी कंपनी के जितने भी प्रिन्सिपल्स है, जो सौर ऊर्जा और बाकी ग्रीन इनिशियेटिव्ह ले रहे है, उसकी एक बहुत बडी पहल हुई है । जिसमे कोल इंडिया बहुत अग्रेसर भूमिका निभा रहा है । अपनी अग्रेसर भूमिका निभा रहा है । इसके अलावा हमारे साथ आज ऑनरेबल मिनिस्टर फोर ट्रान्सपोर्ट नितीन गडकरी जी शामिल हुए और उन्होने हमे प्रोत्साहित किया और उन्होने हमे ये सजेस्ट भी किया कि इसके बारे मे सोचे हम, और कार्य करे उसको आज हम लोगो ने परिपूर्ण किया है ।***

इलेक्ट्रिक उर्जा ही पर्यावरण पूरक असून या वाहनांमध्ये चालक आणि वाहकाला सुद्धा एक आरामदायक अनुभव मिळणार असल्याच त्यांनी सांगितलं. इनलॅन्ड वर्ल्ड लॉजिस्टिकच्या माध्यमातून 20 इलेक्ट्रिक ट्रक आता वेकोलीच्या ताफ्यात दाखल झाले आहेत.

**-------------------------------------**

मध्यवर्ती केंद्र

भारतातील महत्वपूर्ण खनिजांवरील संशोधनासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला मध्यवर्ती केंद्र म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. आयआयटी मुंबई येथील सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून खनिजांवरील संशोधन विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागामध्ये केल जाणार आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय महत्वपूर्ण खनिज मिशन अंतर्गत आयआयटी मुंबईला सेंटर

ऑफ एक्सलन्स म्हणून मान्यता मिळाल्यानंतर विद्यापीठाला शैक्षणिक संशोधनाच मध्यवर्ती केंद्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे. खान मंत्रालयाचे सचिव कंठा राव यांच्या हस्ते २३ ऑगस्ट रोजी आयआयटी मुंबई येथील पहिल्या सेंटर ऑफ एक्सलन्सच उद्घाटन करण्यात आल. या उद्घाटन कार्यक्रमाला महत्वपूर्ण खनिज संशोधनाशी संबंधित शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील केंद्राचे प्रतिनिधी उपस्थित होते. आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि तांत्रिक विकासासाठी अत्यावश्यक असलेल्या खनिजांना महत्त्वपूर्ण खनिज म्हणून ओळखले जातात.

---------------------------------------

हेल्दी स्ट्रीट धोरण

नागपूर महानगरपालिका आणि इन्स्टिटट्यूट फॉर ट्रांसपोर्टेशन अँड डेव्हलपमेंट पॉलीसी यांच्या तांत्रिक सहकार्यान नागपूर शहरातील रस्त्यांना अधिक सुरक्षित, हिरवे आणि सर्वसमावेशक बनवण्यासाठी शहराची पहिले हेल्दी स्ट्रीट्स धोरण तयार केले जात आहे. मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात नागरिकांच्या सोयीकरिता विविध उपाय योजना राबविल्या जात आहेत.

---------------------------------------

हवामान

येत्या काही तासात विदर्भातील भंडारा, गडचिरोली, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. अकोला जिल्ह्यात काल आणि परवा जोरदार पाऊस झाला असून चार महसूल मंडळाच्या परिसरात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

---------------------------------------